एकाच प्रकरणात गुंतलेल्या अनेक कर्मचाऱ्यासंबंधी विभागीय चौकशीची कार्यवाही.

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्रमांक : सीडीआर-१०९३/प्र.क्र. ११/९०/११

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ फेब्रुवारी १९९३.

**परिपत्रक :**

१. पंचायत राज समितीच्या (१९८८–८९) १७ व्या अहवालात, तसेच (१९९१–९२) ८ व्या अनुपालन अहवालात समितीने शासनाच्या असे निदर्शनास आणले आहे की, एका प्रकरणामध्ये एकापेक्षा जास्त प्रशासकीय विभागातील अधिकारी/कर्मचारी गुंतले असताना त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याची जबाबदारी कोणत्याही विभागाने न स्वीकारल्यामुळे ते प्रकरण बराच काळ प्रलंबित राहिले, त्यामुळे काही अधिकाऱ्यांविरुद्ध ते सेवानिवृत्त झाल्यामुळे विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण होऊ शकली नाही. समितीने उपरोक्त अहवालात याबद्दल नाराजी व्यक्त केली असून, ज्यावेळी एखा योजनेत किंवा एखाद्या प्रकरणात विविध विभागाचे अधिकारी/कर्मचारी गुंतले असतील तर, अशा प्रकरणात कोणत्या विभागाने विभागीय चौकशीची कार्यवाही करावी याबाबत सुस्पष्ट आदेश निर्गमित करण्यात यावेत अशी शासनास शिफारस केली आहे.

२. प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने एका विभागातील अधिकारी दुसऱ्या विभागात प्रतिनियुक्तीवर येतात. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेकडे राजपत्रित पदांवर राज्य शासनाच्या संबंधित विभागातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या पदस्थापना करण्यात येतात. साधारणतः जिल्हा परिषदेमध्ये जे गैरव्यवहार होतात, त्यामध्ये राज्य शासनाचे अधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे कर्मचारीही गुंतलेले असतात. अशा प्रकरणांमध्ये कोणती कार्यवाही करावी याबाबत ग्रामविकास विभागाने, शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग, क्रमांक डीईएन-१०८६/१९९१/२०, दिनांक २५ जुलै १९८६ अन्वये सविस्तर आदेश काढलेले आहेत. परंतु त्या आदेशानुसार कार्यवाही केली जात नाही असे दिसून आले. जर या आदेशानुसार कार्यवाही केली असती तर पंचायत राज समितीपुढे प्रकरण उपस्थित झाले नसते.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम १२ नुसार एकत्रित कार्यवाही करण्याची तरतूद आहे. ज्या प्रकरणात भिन्न शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालील कर्मचारी गुंतले असतील अशा कर्मचाऱ्यांच्याबाबतीत शिस्तभंगाची कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांमधील सर्वोच्च अधिकाऱ्याने, इतर शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांच्या संमतीने एकत्रित कार्यवाही करणे आवश्यक आहे. म्हणजेच अशा शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याला इतर शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यापूर्वी त्या शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांबरोबर विचारविनिमय करणे आवश्यक आहे. या कार्यपद्धतीमुळे चौकशीच्या प्रकरणात निर्णय घेण्यास विलंब होण्याची शक्यता जास्त आहे. हा विलंब टाळण्याच्या दृष्टीने ज्या प्रकरणामध्ये विविध शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचारी गुंतले असतील त्यांच्याबाबतीत नियम १२ नुसार कार्यवाही न करता प्रत्येक शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने स्वतंत्र कार्यवाही करावी. ही कार्यवाही करताना खालील पद्धती अनुसरण करण्यात यावी :—

(१) ज्या कार्यालयात अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून गैरव्यवहार/भ्रष्टाचार झाले असतील त्या कार्यालयाच्या प्रमुखाने त्या प्रकरणामध्ये गुंतलेले अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध अचूक व परिपूर्ण असे दोषारोपपत्र तयार करून ते संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे व जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या आत दोषारोपपत्र बजावण्याची कार्यवाही पूर्ण करावी अशा सूचना आहेत. तसेच त्या कार्यालयाने किंवा आवश्यकता असल्यास त्या कार्यालयाच्या प्रशासकीय विभागाने संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकारी जास्तीत तीन महिन्यांच्या आत दोषारोपपत्र बजावतील त्या दृष्टीने पाठपुरावा करावा.

(२) कर्मचाऱ्याने दोषारोप अमान्य केल्यास चौकशी अधिकारी नेमावा लागेल. ज्या कार्यालयामध्ये प्रकरण घडले असेल त्या कार्यालयाने हे प्रकरण कोणत्या चौकशी अधिकाऱ्याकडे सोपविण्यात यावे याची माहिती संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याला द्यावी. शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने अशा चौकशी अधिकाऱ्याची त्या प्रकरणात चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

(३) संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने अशा कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्र बजावण्याची कारवाई दोषारोपपत्र मिळाल्यापासून जास्तीत तीन महिन्यांच्या आत पूर्ण करावी. शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने दोषारोपपत्र बजावून त्यांच्याकडून बचावाचे निवेदन मागविण्याची कारवाई करावी. कर्मचाऱ्याने दोषारोप अमान्य केल्यास वरील (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालय प्रमुखाने निर्देशित केलेल्या चौकशी अधिकाऱ्याकडे चौकशीचे प्रकरण सोपवावे.

(४) चौकशी अधिकाऱ्याने अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध एकाच वेळी साक्षीपुरावे नोंदण्याचे काम पूर्ण करावे व प्रत्येकासंबंधी स्वतंत्र अहवाल सादर करून तो अहवाल संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा. शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने चौकशी अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियमांनुसार कारवाई करावी.

(५) ग्रामविकास विभागाच्या दिनांक २५ जुलै १९८६ च्या परिपत्रकातील परिच्छेद (१) मधील जी प्रकरणे जिल्हा परिषदेमध्ये उद्भवतात त्यांच्या बाबतीत वरील नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. ज्या प्रकरणांमध्ये राजपत्रित अधिकाऱ्यांबरोबर

जिल्हा परिषदेचे कर्मचारी गुंतले असतील तर त्यांची प्रकरणेदेखील राज्य शासनाने नेमलेल्या चौकशी अधिकाऱ्याकडे सोपविण्यात यावी. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने कार्यवाही करावी. जिल्हा परिषदेमध्ये निर्माण झालेल्या प्रकरणांच्या बाबतीत संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध दोषारोपपत्र तयार करून ते संबंधित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याकडे पाठविण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील. त्यांनी दोषारोपपत्र पाठविण्यामध्ये विलंब होणार नाही याची व्यक्तिशः खात्री करणे आवश्यक राहील.

(६) सर्व मंत्रालयीन विभागांनी तसेच विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी वरील आदेशात नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर. वासुदेवन्)
सचिव (सेवा),
महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) राज्यपालांचे सचिव,
(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव,
(३) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
(४) सर्व राज्यमंत्री/उप मंत्री यांचे स्वीय सहायक,
(५) सर्व विभागीय आयुक्त,
(६) सर्व जिल्हाधिकारी,
(७) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
(८) *प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
(९) *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
(१०) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
(११) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
(१२) *प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
(१३) सर्व मंत्रालयीन विभाग,
(१४) सर्व प्रादेशिक विशेष अधिकारी, विभागीय चौकशी, विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
(१५) सर्व सादरकर्ता अधिकारी, विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
(१६) सर्व जिल्हा चौकशी अधिकारी, विभागीय चौकशा, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
(१७) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
(१८) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
(१९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
(२०) सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील विभाग/कार्यालय प्रमुख,
(२१) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
(२२) निवड नस्ती.

*पत्राने

जिल्हाधिकारी, [illegible] करिता.